महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, कोल्हापूर
Email- dmmukolhapur@gmail.com Contact No. ०२३१२६५६३४२

जा.क्र./ जिग्राविय/एमएसआरएलएम/उपजीविका/७१९ /2024 दि.:- ९ / ८ / 2024

प्रति,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.प्र. वि.)
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,कोल्हापूर .

**विषयः- उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कागल व चंदगड तालुक्यात एकात्मिक शेती प्रभाग (IFC) प्रभागातील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कागल व चंदगड तालुक्याकरिता एकात्मिक शेती प्रभागातील IFC Block Anchor - २ पदे आणि Senior CRP (वरिष्ट समुदाय संसाधन व्यक्ती ) – ४ पदे (११ महिने कालावधीकरीता करार तत्वावर) जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षा मार्फत भरावयाची आहे. सदरील पदाची जाहिरात हि किमान दोन 'अ' दर्जाच्या स्थानिक वृत्तपत्रात (किमान दोन) प्रसिद्ध करण्यासाठी सुचना प्राप्त आहेत. करीता वृत्तपत्राची नावे कळविणेत यावी.

**सोबत –जाहिरात व अर्ज नमुना**

प्रकल्प संचालक
जि.ग्रा.वि.यं. तथा सहसंचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,कोल्हापूर

**प्रत :-**

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सी. बी. डी. बेलापुर, नवी मुंबई यांना माहितीस्तव
2. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. तथा जिल्हा अभियान संचालक, उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, कोल्हापूर यांना माहितीस्तव

प्रकल्प संचालक
जि.ग्रा.वि.यं. तथा सहसंचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,कोल्हापूर

# जाहिरात

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत कागल व चंदगड या दोन तालुक्यातील एकात्मिक शेती प्रभाग प्रकल्पा अंतर्गत IFC BLOCK ANCHOR सेवादाता प्रती तालुका १ असे एकूण २ पदे आणि वरिष्ट समुदाय संसाधन व्यक्ती यांचे प्रती तालुका २ पद प्रमाणे (कागल -२ व चंदगड -२ ) एकूण ४ पदे या दोन्ही पदाकरिता दिनांक 20 /८/२०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्रं. | पदाचे नाव | IFC Block Anchor सेवादाता |
|---|---|---|
| १ | | |
| | पद संख्या | २ (कागल -१, चंदगड-१ ) |
| | मानधन | २०,०००/- दरमहा( निश्चित मासिक प्रवास देयक रु. २,५००/-इतके राहील व मूल्यमापन अहवालानुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.) |
| | शैक्षणिक अर्हता | किमान कृषी व कृषी संलग्न पदवी जसे की कृषी तंत्रज्ञान,Bachelor of Science in Agriculture or Bachelor of Science in Horticulture or B Tech. in Agriculture or Bachelor of Science in Fishery, Bachelor of Science in Forestry, Bachelor of Veterinary Science & Bachelor of Science in Animal Husbandry, Bachelor of Business Administration पदवीधारक असणे आवश्यक आहे. |
| | अनुभव | १. कृषी क्षेत्रातला किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | निवडीचे निकष | २. वय : कमाल वय ४३ वर्ष असावे.<br>३. कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन,पशुपालन, मधमाशीपालन ई. क्षेत्रातील शेती आधारित उपक्रम याबाबत माहिती असणे आवश्यक.<br>४. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक व समुदायाला सुलभरीतीने समजावून सांगता येणे आवश्यक<br>५. शेती व शेती आधारित मूल्य वर्धन साखळी उपक्रम अंमलबजावणी बद्दल माहिती असणे आवश्यक<br>६. तांत्रिक ज्ञान- संगणकीय ज्ञान असणे आवश्यक |
| | भुमिका व जबाबदा-या | १. कार्यक्षेत्रातील प्रभागतील वरिष्ठ CRP इतर समुदाय संसाधन व्यक्ती यांचेशी नियमित समन्वय साधून प्रभागाचे कामाचे नियोजन करणे.<br>२. CRP यांचेकडुन प्रभागा तील मुलभुत सर्वेक्षन करुन, मिळालेल्या माहितीच्या आधारावर सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे. व त्याची अंमलबजावणी करणे.<br>३. प्रभागस्तरावर प्रकल्पाचे निरीक्षण आणि मूल्यमापन करुन सदरचा अहवाल LSC कार्यकारिणी समिती, जिल्हा व तालुका अभियान कक्षास अहवाल सादर करणे .<br>४. प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेटी देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | मार्गदर्शन करणे.<br>५. प्रभागाचा मासिक कृती आराखडा तयार करुन आराखडा प्रमाणे काम होनेसाठी प्रयत्न करणे. तसेच सदर कामाचा अहवाल तालुका व्यवस्थापक आणि जिल्हा व्यवस्थापक उपजिवीका यांना दरमहा सादर करणे.<br>६. प्रभागनिहाय Product Development करुन त्याची पॅकर्जीग, ब्रडींग व संबधित मार्केटिंग उपक्रमाकरीता कामे पाहणे. तसेच LSCचे व्यवस्थापन करणे. उपक्रम निहाय लेखे व बैठकीचे इतिवृत्त अद्यावत ठेवणे आणि वैवध्यिपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी करणे.<br>७. प्रभागामधील विविध प्रक्रिया युनिट (Processing Unit) एकत्रीकरण सेंटर (Collection Center) निविष्ठा यांची नियमित देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक सहाय्य करणे.<br>८. LSC कामाच्या प्रगतीचाआढावा घेणे. अद्यावत प्रगतीचा MIS राखणे. |
| | निवड प्रक्रिया | १. लेखी परिक्षा ४० गुण<br>२. प्रत्यक्ष मुलाखत १० गुण |
| | | लेखी व तोंडी परीक्षेचे निकष:-<br>▪ लेखी परीक्षेची काठीण्य पातळी डिप्लोमा राहील.<br>▪ लेखी परीक्षेचे विषय व गुणांकन पुढीलप्रमाणे.<br>• बुध्दिमत्ता चाचणी – ५ गुण<br>• गणित – ५ गुण<br>• कृषी व कृषी संलग्न – ३० गुण<br>▪ सदर परिक्षा हि बहुपर्यायी असेल.<br>▪ तोंडी परीक्षा हि १० गुणांची असेल. तोंडी परीक्षेमध्ये संबंधित व्यक्तीचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव या सारख्या बाबींचा अधारावर गुणांकन करणेत येईल. |

| अ.क्र२ | पदाचे नाव | Senior CRP (वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती ) |
|---|---|---|
| | पद संख्या | ४ (कागल-२ व चंदगड -२ ) |
| | मानधन | प्रवास देयकासह दरमहा मानधन ६,०००/- (निश्चितमासिक प्रवास देयक रु. १,५००/- इतके समाविष्ट राहील व मूल्य मापन अहवालानुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल).<br>सदर मानधन एकात्मिक शेती प्रभाग संघाची मालकी दिलेल्या प्रभागसंघातून करण्यात येईल. |
| | शैक्षणिक अर्हता | १. किमान १२ वी पास<br>२. उमेद- एमएसआरएलएग अभियानातील कृषी सखी, पशु सखी ,उदयोग सखी,वन सखी इ. पदावर किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक<br>३. संबधित तालुक्यातील व संबंधित प्रभागातील गावातील रहिवासी असणे आवश्यक |
| | अनुभव | उमेद अभियानात किमान ३ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक |
| | निवडीचे | १. वय कमाल ४३ वर्ष |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| निकष | २. समुदाय संसाधन व्यक्ति हि कार्यक्षेत्रात उपजीविका सखी उदा. कृषी सखी पशु सखी M-CRP (कृषी ) उद्योग सखी,वन सखी इ. मध्ये कार्य कार्य करणारी असावी.<br>३. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक व समुदायाला सुलभरीतीने समजावून सांगता येणे आवश्यक<br>४. विविध ३-५ गावात काम करण्याची तयारी असावी.<br>५. निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तयारी असावी.<br>६. ग्रामसंघ व उत्पादक गटाचे लेखे लिहिण्याचा अनुभव असावा<br>७. मार्केटिंग उपक्रम करीता काम पाहण्याची तयारी असावी. |
| भुमिका व जबाबदा-या | १. CRP ज्या cluster मधील गावपातळीवर उपजीविका CRPs द्वारे प्रशिक्षण देणे आणि अंमलबजावणीला सहकार्य करण्याची प्राथमिक जबाबदारी असेल.<br>२. उपजिविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन पाहणे.<br>३. उपजीविका CRPs च्या माध्यमातून एकात्मिक शेती प्रभागात प्रस्थापित उपक्रमातून जास्तीत जास्त शेतकरी यांच्या पर्यंत सेवा पुरविणे.<br>४. IFC प्रभागाच्या सुक्ष्म नियोजन आराखडा अनुसार, हंगामपूर्व शेतक-यांची उपक्रम निहाय माहिती जमा करणे, त्या बद्दलचा अहवाल CLF व LSC कार्यकारिणी समितीच्या समोर सादर करणे.<br>५. एकात्मिक शेती प्रभागाचे लेखे नियमित अद्यावत राखणे.<br>६. उत्पादनाचे मार्केटिंग करण्यासाठी प्रभागाला मदत करणे.<br>७. प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.<br>८. गरजेनुसार प्रशिक्षणाचे नियोजन करुन अहवाल IFS BLOCK ANCHOR व LSC कार्यकारिणी समिती समोर सादर करणे<br>९. अद्यावत MIS राखणे.<br>दरमहा केलेल्या कामाचा अहवाल IFC Block Anchor व LSC कार्यकारिणी समिती समोर सादर करणे.<br>१०. प्रभागातील VO सह समन्वयाने काम करणे. |
| निवड प्रक्रिया | १. लेखी परिक्षा ४० गुण व प्रत्यक्ष मुलाखत १० गुण. |
| | लेखी व तोंडी परीक्षेचे निकष:-<br>▪ लेखी परीक्षेची पातळी १२ वी राहील.<br>▪ लेखी परीक्षेत कृषी व कृषी सलग्न विषयी ५० टक्के प्रश्न राहतील,<br>▪ तोंडी परीक्षा हि १० गुणांची असेल. तोंडी परिक्षे मध्ये संबंधित व्यक्तिचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव या सारख्या बाबींचा आधारावर गुणांकन करण्यात येईल.<br>▪ लेखी व तोंडी परीक्षेचे गुण एकत्रित करुन जास्तीत जास्त गुण प्राप्त केलेल्या व व्यक्तीची निवड करण्यात येईल |

Scanned with OKEN Scanner

सदर दोन्ही पदाकरिता परिपूर्ण भरलेले अर्ज (शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह) अंतिम दिनांक २०/८/२०२४ रोजी सायं.०५:०० वाजेपर्यंत व्यक्ती श:/टपालाव्दारे विहित मुदतीत उमेद- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती (MSRLM) जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद, कोल्हापूर . या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने सादर करण्यात यावे. विहित मुदती नंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

........................या पदासाठी अर्ज

उमेदवाराचा फोटो

१. उमेदवराचे नांव :-

२. पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता : -

३. तालुका :-

४. जिल्हा :-

५. मोबाईल क्रं. :-

६. ई-मेल. :-

७. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्रं. | परिक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापिठाचे नाव | उतीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. संगणक हाताळण्याचे ज्ञान आहे का ? असल्यास त्याची माहिती

९. उमेदवारास दुचाकी वाहन चालविता येते का ?

Scanned with OKEN Scanner

१०. अर्जासोबत जोडण्यात येत असलेल्या कागदपत्राची यादी –

१.

२.

३.

११. अनुभव :-

| अ.क्रं | पदाचे नांव | संस्थेचे नाव | कामाचा कालवधी महिना व वर्ष | भूमिका व जाबादारी | वेतन/ मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

मी असे प्रमाणीत करते/करतो की, आपले कार्यालयातील ..............................................................या पदाची जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती. खरी असुन चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील. याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :- (उमेदवाराची स्वाक्षरी )

Scanned with OKEN Scanner